महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली

**(निवडणूक शाखा)**

कॉम्पलेक्स एरिया, गडचिरोली ता.जि.गडचिरोली-442605
दुरध्वनी क्रमांक 07132-222011/222086 Email – dcgen.gadchiroli@gmail.com

क्र.कार्या-10/स.म.अ.ग्रापंनि/कावि/ 505 /2025 दिनांक :- 09 ऑक्टोंबर, 2025

**निवडणूक तात्काळ/अत्यंत महत्वाचे**

प्रति,

1) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली
2) उप विभागीय अधिकारी, (सर्व)
3) तहसिलदार, (सर्व)
4) गट विकास अधिकारी, (सर्व)
5) जिल्हा नाझर, जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली

विषय :- जिल्हा परिषद व पंचायत समित्या सार्वत्रिक निवडणुका 2025
जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गणांचे आरक्षण सोडत बाबतचे जाहीर प्रकटन कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :-1. ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन अधिसूचना दिनांक 20 ऑगष्ट, 2025
2. मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र.रानिआ/जिपांस-2025/प्र.क्र.30/का.7 दि. 01.10.2025
3. मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे आदेश क्र.रानिआ/जिपपंस-2025/प्र.क्र.29/का-7 दि.1.10.2025

जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, 1961 मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती मधील आरक्षण निश्चित करणे, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) यांच्या आरक्षणाची सोडत दिनांक 13.10.2025 रोजी काढणेबाबत संदर्भिय आदेश क्र. 3 अन्वये निर्देश प्राप्त आहेत.

त्यानुषंगाने गडचिरोली जिल्ह्यातील 51 जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी आरक्षण सोडत जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे आयोजित केलेली आहे. तसेच 102 पंचायत समिती निर्वाचक गणासाठी आरक्षण सोडत हे तालुक्याच्या मुख्यालयी तहसिल कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गणाची आरक्षण सोडत संबंधात जाहीर प्रकटन परिशिष्ट 7 आपले कार्यालयीन सुचना फलकावर प्रसिध्द करुन त्यास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

सहपत्र :- जाहीर प्रकटन ची प्रत

(स्मिता बेलपत्रे)
**उप जिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली**

प्रतिलीपी :- प्रत माहितीस सविनय सादर,
1. मा. अवर सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र मुंबई
2. मा. आयुक्त, नागपूर विभाग नागपूर

**उप जिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली**